नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १२/०५/२०२६ (मंगळवार )

# मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी पिपरिया, सिल्ली आणि पेंच येथील MARVEL कृत्रिम बुध्दीमत्ता प्रणाली द्वारे लावलेल्या कॅमेऱ्यांची केली पाहणी

**MARVEL ( Maharashtra Research and Vigilance for Enhanced Law Enforcement )** ने विदर्भातील वनक्षेत्राच्या भागांमध्ये AI सक्षम देखरेख कॅमेरे बसविले आहे. त्या अनुषंगाने आज दिनांक १२/०५/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांनी पोलीस स्टेशन देवलापार हद्दीतील पिपरिया, सिल्लरी, पेंच येथे लावलेल्या AI सक्षम देखरेख कॅमऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली.

सदर प्रकल्पांच्या माध्यमातुन वनक्षेत्रालगत गावांमध्ये वन्यप्राण्यांची हालचाल वेळेवर ओळखणे शक्य होत असुन नागरिकांना तात्काळ इशारे देण्याची सुविध उपलब्ध झाली आहे. यामुळे माणूस – वन्यप्राणी यांच्यातील संघर्षात लक्षणीय घट होत असल्याचे निदर्शनास आले आहे.हा उपक्रम स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेसोबतच वन्यजीव संवर्धनासाठीही अत्यंत उपयुक्त ठरत असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वनक्षेत्रातील सुरक्षा अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**सदर वेळी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्यासह , सहा वनसंरक्षक श्रीमती लिमगावकर, सहा वनसंरक्षक श्री भारती, देवलापार पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी सपोनि श्री नारायण तुरकुंडे आणि MARVEL चे अधिकारी हजर होते.**







# नागपूर ग्रामीण जिल्हयात अपघात व मृत्यू दरात लक्षणीय घट महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्हयांमध्ये नागपूर ग्रामीण जिल्हयाला तिसरे स्थान प्राप्त

नागपूर ग्रामीण पोलिसांनी सातत्यपूर्ण व परिणामकारक रस्ते सुरक्षा उपाययोजनांद्वारे रस्ते अपघात व मृत्यूंमध्ये लक्षणीय घट साध्य केली आहे. सन २०२६ (जानेवारी ते एप्रील) सन २०२५ च्या तुलनेत रस्ते अपघात आणि मृत्यूंमध्ये उल्लेखनीय घट नोंदविण्यात आली आहे.

देशातील रस्ते अपघातांच्या दृष्टीने उच्च प्राधान्य असलेल्या टॉप १०० जिल्ह्यांमध्ये नागपूर जिल्ह्याचा समावेश असून, या अनुषंगाने येथे सेव्ह लाईफ फाउंडेशन (SaveLife Foundation) यांच्या तांत्रिक सहकार्याने Zero Fatality District (ZFD) उपक्रम राबविण्यात येत आहे. सदर उपक्रम मा. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्यमंत्री कार्यालय (CMO) आणि मा. पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निरीक्षणाखाली प्रभावीपणे अंमलात आणला जात आहे.

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सर्वसमावेशक व डेटा—आधारित रस्ते सुरक्षा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, या उपक्रमामुळे रस्ते सुरक्षा उपाययोजनांना अधिक बळकटी प्राप्त होत आहे.

सदर कालावधीत प्राणांतिक रस्ते अपघातांमध्ये १८ टक्क्यांनी, मृत्यूंमध्ये २५ टक्क्यांनी, तर जखमींच्या संख्येत १४ टक्क्यांनी घट झाली आहे. तसेच, महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये नागपूर ग्रामीण जिल्ह्याने तिसरे स्थान प्राप्त केले आहे.

# MAHARASHTRA STATE

## Total Accidents Comparative " Descending Order "

| Sr. No | POLICE UNIT | JAN TO APR 2025* | | | JAN TO APR 2026 | | | COMPARATIVE % (JAN TO APR 2025*- 2026) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured |
| 1 | Gadchiroli | 78 | 57 | 46 | 114 | 50 | 131 | 46 | -12 | 185 |
| 2 | Raigad | 205 | 84 | 219 | 254 | 99 | 305 | 24 | 18 | 39 |
| 3 | Ratnagiri | 118 | 41 | 124 | 142 | 44 | 150 | 20 | 7 | 21 |
| 4 | MB-VV | 255 | 58 | 227 | 301 | 58 | 276 | 18 | 0 | 22 |
| 5 | Amravati City | 138 | 27 | 137 | 157 | 42 | 157 | 14 | 56 | 15 |
| 6 | Hingoli | 143 | 80 | 113 | 160 | 97 | 114 | 12 | 21 | 1 |
| 7 | Jalna | 222 | 125 | 200 | 244 | 134 | 206 | 10 | 7 | 3 |
| 8 | Gondia | 124 | 64 | 76 | 136 | 80 | 94 | 10 | 25 | 24 |
| 9 | C.S.Nagar R | 288 | 188 | 157 | 315 | 174 | 231 | 9 | -7 | 47 |
| **10** | **Pune R** | 646 | 333 | 517 | 699 | 321 | 451 | 8 | -4 | -13 |
| 11 | Nasik City | 185 | 78 | 179 | 200 | 56 | 195 | 8 | -28 | 9 |
| 12 | Latur | 272 | 126 | 178 | 294 | 138 | 170 | 8 | 10 | -4 |
| 13 | Navi Mumbai | 273 | 108 | 238 | 294 | 87 | 284 | 8 | -19 | 19 |
| 14 | Amravati R | 166 | 109 | 125 | 177 | 125 | 133 | 7 | 15 | 6 |
| 15 | Akola | 155 | 68 | 119 | 164 | 62 | 135 | 6 | -9 | 13 |
| 16 | C.S.Nagar City | 219 | 64 | 189 | 228 | 70 | 208 | 4 | 9 | 10 |
| **17** | **PCPC** | 439 | 129 | 390 | 450 | 116 | 459 | 3 | -10 | 18 |
| **18** | **Thane City** | 384 | 84 | 387 | 392 | 87 | 377 | 2 | 4 | -3 |
| 19 | Chandrapur | 254 | 119 | 212 | 258 | 109 | 236 | 2 | -8 | 11 |
| 20 | Dhule | 227 | 138 | 218 | 229 | 130 | 236 | 1 | -6 | 8 |
| **21** | **Pune City** | 457 | 102 | 367 | 461 | 103 | 380 | 1 | 1 | 4 |
| 22 | Thane R | 153 | 88 | 139 | 154 | 92 | 147 | 1 | 5 | 6 |
| 23 | Palghar | 182 | 114 | 76 | 181 | 109 | 124 | -1 | -4 | 63 |
| 24 | Beed | 259 | 157 | 165 | 257 | 111 | 161 | -1 | -29 | -2 |
| **25** | **Solapur R** | 405 | 230 | 419 | 400 | 234 | 430 | -1 | 2 | 3 |
| 26 | Solapur City | 77 | 25 | 90 | 76 | 28 | 56 | -1 | 12 | -38 |
| 27 | Jalgaon | 299 | 160 | 254 | 292 | 171 | 207 | -2 | 7 | -19 |
| **28** | **Nasik R** | 537 | 343 | 696 | 517 | 309 | 632 | -4 | -10 | -9 |
| **29** | **Mumbai City** | 920 | 143 | 938 | 872 | 111 | 927 | -5 | -22 | -1 |
| 30 | Parbhani | 185 | 94 | 158 | 174 | 88 | 116 | -6 | -6 | -27 |
| 31 | Wardha | 146 | 70 | 153 | 136 | 70 | 113 | -7 | 0 | -26 |
| 32 | Sindhudurg | 67 | 33 | 72 | 62 | 28 | 70 | -7 | -15 | -3 |
| 33 | Buldhana | 247 | 151 | 216 | 228 | 129 | 153 | -8 | -15 | -29 |
| 34 | Satara | 362 | 198 | 259 | 334 | 165 | 249 | -8 | -17 | -4 |
| 35 | Sangli | 354 | 200 | 279 | 325 | 166 | 236 | -8 | -17 | -15 |
| **36** | **Kolhapur** | 402 | 154 | 355 | 362 | 150 | 317 | -10 | -3 | -11 |
| 37 | Nandurbar | 119 | 70 | 145 | 107 | 61 | 187 | -10 | -13 | 29 |
| **38** | **Nagpur City** | 434 | 118 | 427 | 382 | 84 | 397 | -12 | -29 | -7 |
| 39 | Bhandara | 149 | 71 | 126 | 131 | 59 | 146 | -12 | -17 | 16 |
| **40** | **Ahilyanagar** | 707 | 334 | 562 | 617 | 277 | 444 | -13 | -17 | -21 |
| 41 | Washim | 118 | 78 | 76 | 100 | 49 | 94 | -15 | -37 | 24 |
| 42 | Dharashiv | 236 | 138 | 225 | 198 | 120 | 175 | -16 | -13 | -22 |
| 43 | Nagpur R | 348 | 168 | 384 | 287 | 126 | 332 | -18 | -25 | -14 |
| 44 | Nanded | 346 | 189 | 213 | 280 | 165 | 140 | -19 | -13 | -34 |
| 45 | Yavatmal | 310 | 173 | 233 | 248 | 149 | 151 | -20 | -14 | -35 |
| | TOTAL | 12610 | 5681 | 11078 | 12389 | 5233 | 10932 | -2 | -8 | -1 |

Page 1

# अल्पवयीन बालीकेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन सावनेर** :— फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सावनेर येथे अप क्र. ५०१/२०२५ कलम ७४, ३३३ भा.न्या. सं. सह कलम ८, १२ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक ०२/०६/२०२५ रोजी यातील आरोपी नामे उत्तम शामराव गजभिये, वय ५१ वर्ष, रा. वार्ड नं. १७, पहलेपार सावनेर याने अल्पवयीन पिडीतेचे आई वडील घरी नसतांना पिडीतेच्या घरात घुसुन अल्पवयीन पिडीतेला अश्लील स्पर्श करून तिचा विनयभंग केला.

श्री स्वप्नील गेडाम, पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक पोलीस स्टेशन सावनेर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **दिनांक १२/०५/२०२६ रोजी मा. अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायधीश श्री पी. जे. मोडक यांनी नमुद आरोपी नामे उत्तम शामराव गजभिये, वय ५१ वर्ष, रा. वार्ड नं. १७, पहलेपार सावनेर यास कलम ३३३ भा.न्या.सं. मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व ५००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास, कलम ८ पोक्सो मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व १,००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास ३ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती आशावरी परसोडकर यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री. उमेश पाटील, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन सावनेर , पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री मनोज तिवारी,ब.नं १६४१, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण आणि पोहवा मधुकर आदमने, ब.नं ३७६, नेम. पोलीस स्टेशन सावनेर यांनी महत्वपुर्ण योगदान दिले.

# पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत खुन करणाऱ्या आरोपीस अटक

**पोलीस स्टेशन नरखेड :–** दिनांक ११/०५/२०२६ रोजी फिर्यादी अमोल भिमराव उईके, वय २८ वर्ष, रा. येणीकोणी,ता. नरखेड यांनी पोलीस स्टेशन नरखेड येथे तक्रार दिली की, दिनांक ०९/०५/२०२६ रोजी आठवडी बाजार नरखेड येथे फिर्यादीचा भाऊ राजू भिमराव उईके, वय २८ वर्ष, रा. येणीकोणी ता. नरखेड हा मृत अवस्थेत मिळुन आल्याने पोलीस स्टेशन नरखेड येथे मर्ग क्र. २६/२०२६ कलम १९४ भा.ना.सु.सं. अन्वये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. सदर प्रकरणाच्या तपासादरम्यान घटनास्थळावरील साक्षीदार यांच्या बयानावरून मृतक राजू भिमराव उईके याने आरोपी अनिल हरिभाऊ उईके, वय २९ वर्ष, रा. सारडी पिठोरी, ता. नरखेड, जि. नागपुर याला अश्लील शिवीगाळ केल्याचे कारणावरून आरोपी अनिल हरिभाऊ उईके याने त्याचे सोबत भांडण करून धक्काबुक्की करून दगडाने डोक्यावर मारून त्याला जिवानीशी ठार केल्याचे निष्पन्न झाले.

**पोलीसांनी सदर प्रकरणात कलम १०३(१) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करून आरोपी नामे अनिल हरिभाऊ उईके, वय २९ वर्ष, रा. सारडी पिठोरी, ता. नरखेड, जि. नागपुर यांना तात्काळ ताब्यात घेत दिनांक ११/०५/२०२६ रोजी अटक केली आहे. नमुद आरोपीस मा न्यायालयाने दिनांक १३/०५/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.**

# पोलीस ठाणे पाचगाव हद्दीतील मौजा वळद शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपींवर २ गुन्हे नोंद, ०२ लाख १९ हजार २५० रूपयांचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव :—** दिनांक १२/०५/२०२६ रोजी पाचगाव पोलीस स्टेशन हद्दीतील वळद शिवारात मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे अशा गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर बातमीवरून मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पाचगाव पोलीसांनी वडद शिवारात घटनास्थळावरील रनिंग हातभट्टया नष्ट केल्या.

**कारवाई क्रं १)** महीला आरोपी हीचेवर कारवाई घटनास्थळावरून १८०० लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि १०० लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले ४०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, लोखंडी ड्रम,प्लास्टीक ड्रम, जळाउ लाकुड आणि इतर साहित्य जप्त केले. **कारवाई क्रं २)** दुसऱ्या महीला आरोपीवर कारवाईघटनास्थळावरून १२०० लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि १०५ लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले ८०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, लोखंडी ड्रम,प्लास्टीक ड्रम, जळाउ लाकुड आणि इतर साहित्य जप्त केले.

**पोलीसांनी घटनास्थळावरून दोन्ही कारवाईत पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण एकुण ३००० लिटर मोहाफुल सडवा, २०५ लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले १२०० लिटर मोहाफुल रसायन सडवा प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण २,१९,२५०/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये प्रत्येकी १ असे २ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**







# नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०४ गुन्हे नोंद.

दिनांक ११/०५/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन रामटेक, देवलापार, वेलतूर, कन्हान यांनी अवैधरित्या सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण २०१८/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे धनराज सोमाजी इडपाची, रा. अमराइ वार्ड क्र ०५, मनसर ता. रामटेक याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे १) जहीर हनीफ अंसारी, वय ३९ वर्ष, २) रूपेश केशवराव शेंडे, वय ३८ वर्ष, दोन्ही

रा. वार्ड क्र. ५, देवलापार यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे दिपक भगवान खोब्रागडे, वय ४२ वर्ष, रा. सिर्सी पुनर्वसन, ता. कुही, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे तारेश पांडुरंग कांबडे, वय ६० वर्ष, रा. कुंभारे कॅलनी, कामठी यांचेवर ०१ गुन्हा नोंद, अशा आरोपीतांवर महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये ०४ गुन्हे दाखल केले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २० गुन्हे नोंद

दिनांक ११/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ८२४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन केळवद** येथे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे ३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे ५ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे ४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे १ गुन्हा नोंद आहे.

**नमुद कारवाईत एकुण ५० लिटर मोहाफुल गावठी दारू, १००८० मिली देशी दारू तसेच असा एकुण ८२४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७५१ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १२/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७५१ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २१ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव ०५ आरोपी अशा एकुण १३८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ५४ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १४४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १४ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १२ आरोपी अशा एकुण ६० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २४ आरोपी अशा एकुण १४३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ७२ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १६९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २३ पोलीस स्टेशन येथे एकुण ७५१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने